# प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख) म.रा.नागपूर यांचे कार्यालय

वनभवन रामगिरी रोड, सिव्हील लाईन्स, नागपूर -440001

क्रमांक :- कक्ष-13/आस्था-5/संकिर्ण/प्रक्र- 6/ 1870 /22-23
नागपूर - 440001 दिनांक 08/02/2023

प्रति,

मुख्य वनसंरक्षक (प्रा) सर्व
वनसंरक्षक (प्रा) सर्व

विषय :- वैद्यकिय खर्च प्रतिपूर्तीच्या देयकांबाबत.

संदर्भ :- 1) महसूल व वनविभाग, कार्यासन अधिकारी यांचेकडील पत्र कक्ष क्रमांक - आस्था-2022 /प्रक्र-53/फ-12, दिनांक 11.01.2023
2) सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्रमांक वैखप्र-2022/प्रक्र-120/राकावि-2,दिनांक 17.01.2023

विषयांकित प्रकरणी संदर्भिय शासन पत्र क्र. 1 अन्वये कळविल्यानुसार शासन सेवेतील अधिसंख्य वनमजुरांची 3 लाखवरील वैद्यकिय खर्चाची देयके लेखाशिर्षाविना प्रतिपूर्तीसाठी शासनास पाठविले जातात. संदर्भ 2 अन्वये वित्तीय अधिकारात सुधारणा केल्याप्रमाणे आता 5 लाखवरील वैद्यकिय खर्चाची देयके लेखाशिर्षासह प्रतिपूर्तीसाठी शासनास पाठवायची आहे

सदर वैद्यकिय देयकाच्या प्रतिपुर्तीच्या अनुषंगाने उपसंचालक, आरोग्य सेवा रुग्णालये (राज्यस्तर), मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या समितीने दिलेले अभिप्राय खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र | खर्चाची बाब | उपसंचालक आरोग्य सेवा यांचे अभिप्राय |
|---|---|---|
| 1 | औषधोपचार | कमाल मर्यादा एकूण औषधोपचार खर्चाच्या 90% रक्कम अनुज्ञेय. तत्पूर्वी देयकामध्ये समाविष्ट असलेल्या सोबतच्या यादीतील नादेय बाबींची वजाती शा.नि. दिनांक 19.07.2022 नुसार करण्यात यावी. |
| | रुग्णालयातील वास्तव्य खर्च | आ.सी.यू अनुज्ञेय रुपये 2000/- प्रतिदिन<br>इतर कक्ष अनुज्ञेय रुपये 1000/- प्रतिदिन |
| | डॉक्टर व्हिजीट चार्जेस | रुपये 500/- प्रति व्हिजीट अनुज्ञेय |
| | Ventilator Charges | कमाल अनुज्ञेय रुपये 3000/- प्रतिदिन |
| | अनुज्ञेय नसलेला खर्च | Other Charges या बाबींची वजाती करण्यात यावी. |

करिता, आपणास कळविण्यात येत आहे की, अधिसंख्य वनमजुरांचे वैद्यकिय खर्च प्रतिपूर्तीचे देयके शासनाकडे मंजुरीस्तव पाठविताना उपरोक्त प्रमाणे वजाती करुन शासन निर्णय दिनांक 19.03.2005 नुसार परिगणना करुनच प्रस्ताव शासनास सादर करण्याकरीता पाठवावे.

तसेच शासनाकडे प्रलंबित असलेले प्रस्तावामध्ये सुध्दा यापुर्वी लेखाशीर्षाची माहिती उपलब्ध करुन देण्यात आली नसल्याने ती सुध्दा उपलब्ध करुन देण्यात यावी. यापुढे अधिसंख्य वनमजुरांची वैद्यकिय प्रतिपुर्ती देयके बाबत प्रस्ताव शासनाकडे मंजुरीकरीता सादर करावयाची असल्यास त्यामध्ये लेखाशीर्ष नमुद असल्याची खात्री वृत्तस्तरावर करण्यात यावी. सदर बाब आपले अधिनस्थ कार्यालयास सुध्दा अवगत करुन दयावे, ही विनंती.

सहपत्र - वरिलप्रमाणे

(डी.एम.सहारे)
प्रशासकीय अधिकारी
प्रधान मुख्य वनसंरक्षक
म.रा.नागपूर यांचे कार्यालय